गावठाण जमाबंदी प्रकल्प
राबविण्याकरिता नवीन
लेखाशिर्षास मान्यता देणेबाबत

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः गाजप्र-२०१९/प्र.क्र.१४८/पंरा-४
बांधकाम भवन,२५ मर्झबान पथ,
फोर्ट, मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
तारीखः ३१ ऑगस्ट, २०१९.

वाचा -

१) शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१३/मातंक,दिनांक २२ फेब्रुवारी,२०१९.

२) महालेखाकार कार्यालय (लेखा व हकदारी)-१, सं: ख.वि./चा-१/ग्रा.वि.वि.ज.सं.वि./ यू.ओ.आर-३३/२०१८-१९/२००,दि.२१.५.२०१९.रोजीचे पत्र.

प्रस्तावना -

राज्यातील सर्व गावांच्या गावठाणामधील जमिनींचे GIS आधारित सर्वेक्षण व भूमापन करणेबाबतची योजना ग्रामविकास विभाग,जमाबंदी आयुक्त यांचे कार्यालय व भारतीय सर्वेक्षण विभाग,डेहराडून यांच्या संयुक्त सहभागाने राबविण्यास वाचा येथील क्रमांक १ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून सर्व गावांचे गावठाण भूमापन करून मिळकत पत्रिका स्वरुपात अधिकार अभिलेख व गावातील मालमत्तांचे GIS प्रणालीवर आधारित मालमत्ता पत्रक तयार करण्यात येणार आहे. सदरील शासन निर्णयान्वये नवीन लेखाशीर्ष उघडण्यास मान्यता मिळाली होती.त्यानुसार गावठाण जमाबंदी प्रकल्पाचा नवीन लेखाशिर्ष उघडण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

गावठाण जमाबंदी प्रकल्प राबविण्यास वाचा येथील क्र.१ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. महालेखाकार कार्यालय यांनी वाचा येथील क्र.२ अन्वये दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने सदरील प्रकल्पास निधी उपलब्ध करून देण्याकरिता पुढीलप्रमाणे नवीन लेखाशिर्ष उघडण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(इंग्रजी)	(मराठी)
Demand No.L-०३ २५१५, Other Rural Development Programes ०० १०६, Provision of Urban Amenities in Rural Areas, (००) (००)(०३) Gaothan Settlement Project (scheme) (२५१५२५७५)	मागणी क्र.एल-०३, २५१५,इतर ग्रामीण विकास कार्यक्रम, ०० १०६,ग्रामीण भागात नागरी सुविधा निर्माण करणे, (००) (००)(०३) गावठाण जमाबंदी प्रकल्प (कार्यक्रम)(२५१५२५७५)

सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक सं.क्र.७५/१९/१४४४, दि.१०.४.२०१९ अन्वये तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक सं.क्र.१८१/२०१९/व्यय-१५, दि.२६.४.२०१९ अन्वये दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८३१११३१५०१५२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Bansirao Karad

Digitally signed by Santosh Bansirao Karad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development and Water Conservation, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f981d5a9fec2e5d5dc36f39695b5f0e4ff5b340cd5420df7cbaa28990d692e36, cn=Santosh Bansirao Karad
Date: 2019.08.31 15:35:52 +05'30'

संतोष कराड
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) अपर मुख्य सचिव(महसूल),महसूल व वने विभाग,मंत्रालय ,मुंबई
२) अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई.
३) जमाबंदी आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे,
४) महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा व अनुज्ञेयता).
५) महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर (लेखा व अनुज्ञेयता) .
६) महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१ मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर

७) उपसचिव(रोखाशाखा),ग्रामविकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
८) विभागीय आयुक्त,सर्व.
९) जिल्हाधिकारी,सर्व.
१०) मुख्य कार्यकारी अधिकारी,सर्व
११) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
१२) अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई.
१३) निवासी लेखापरीक्षा अधिकारी,मुंबई
१४) जिल्हा कोषागार अधिकारी(सर्व).
१५) सर्व सह सचिव/ उप सचिव/ अवर सचिव/ कार्यासन अधिकारी ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मंत्रालय, मुंबई.
१६) कार्यालय अधिक्षक (लेखा), जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख , महाराष्ट्र राज्य, पुणे.
१७) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी (रोख शाखा), ग्रामविकास विभाग,मंत्रालय.मुंबई
१८) प्रधान सचिव (ग्राम विकास) यांचे स्वीय सहायक.
१९) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
२०) नियोजन विभाग (का.१४४४),मंत्रालय,मुंबई.
२१) वित्त विभाग(व्यय-१५ व अर्थ-१७),मंत्रालय,मुंबई.
२२) माहिती तंत्रज्ञान कक्ष (ग्रा.वि.वि), बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई.
२३) आपले सरकार कक्ष (ग्रा.वि.वि), बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई
२४) निवडस्ती, कार्यासन पंरा-४.